पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३४८ /२०१५
दिनांक : ३०/०४/२०१५

प्रति,

मा.......................................
सदस्य, क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा समितीची पाक्षिक सभा दिनांक **०६/०५/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०६/०५/२०१५** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.क्रीडा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १६**

दिनांक : **०६/०५/२०१५** वेळ : दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०६/०५/२०१५** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक १५/०४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१५)** चा सभावृत्तांत कायम करणे.

---------

विषय क्र.१) ई निविदा क्र.१/९/२०१३-१४ मोहननगर, जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामासाठी प्राप्त झालेले फर्स्ट लोएस्ट ठेकेदार (औंकार इंजिनिअरींग) २ वर्षाचे लघुत्तम दरानुसार पहिल्या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,११,६००/- या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च र.रु.१३,३९,२००/- तसेच दुस-या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,२०,९००/- या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च र.रु.१४,५०,८००/- एकूण र.रु.२७,९०,०००/- चे कामकाज सेकंड लोएस्ट ठेकेदार मे.वरदायिनी एन्टर प्राईजेस, चिंचवड पुणे ३३ यांचेकडून करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेकामी व येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक ०६/०५/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) म.न.पा.चा इंद्रायणीनगर से.नं.०१ भोसरी येथील बॅडमिंटन हॉल राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र, पुणे ०६ या संस्थेस दरमहा र.रु.८,९५९/- सेवा शुल्क देऊन (फक्त एक कोर्टचे भाडे) दि.०१/०२/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ अखेर ११ महिने कालावधीसाठी चालविणेस मुदतवाढ देणे व दि.०१/०३/२०१४ ते दि.३१/०१/२०१५ अखेर मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने मनपा परिसरातील उदयोन्मुख खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या उद्देशाने क्रिकेट, अथलेटिक्स, बॉक्सिंग, हॉकी, नेमबाजी, फुटबॉल, सॉफ्टबॉल इ. खेळांचे १० ते १५ वर्षे या वयोगटातील एकूण ४०० विद्यार्थ्यांकरिता उन्हाळी प्रशिक्षण शिबीर दिनांक ११ मे २०१५ ते २५ मे २०१५ अखेर १५ दिवस कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर व श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी येथे आयोजित

करणेस व त्याकामी येणारे र.रु.३,२५,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख पंचवीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता व सदरचा खर्च क्रीडा निधी, क्रीडा शिक्षण शिबीर या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ करिता केलेल्या र.रु.५,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | खेळाडू अल्पोपहार खर्च<br>४०० खेळाडू x र.रु.५०/- x १५ =३,००,०००/- | ३,००,०००/- |
| २ | क्रीडा व्याख्याते मानधन<br>प्रतिदिनी र.रु.१०००/- x १५ = १५,०००/- | १५,०००/- |
| ३ | शिबीर उदघाटन व समारोप बुके खर्च<br>१५ x १०० x २ दिवस =३,०००/- | ३,०००/- |
| ४ | शिबीर उदघाटन व समारोप बुके खर्च<br>५० x १० x २ दिवस =२,०००/- | २,०००/- |
| ५ | शिबीर अनुषंगाने किरकोळ खर्च र.रु. | ५,०००/- |
| | **एकूण खर्च र.रु.** | **३,२५,०००/-** |

विषय क्र.४) महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्रमांक १८ प्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे **कु.नुपुर लक्ष्मण मोरे** हिची बँकॉक थायलॅड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- ( अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५) महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्रमांक १८ प्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे **कु.स्वरदा कुमार देशपांडे** हिची बँकॉक थायलॅड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- ( अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६)अ.क्र.१) वैदुवस्ती व्यायामशाळा, पिंपळे गुरव, २) बळवंत चिंचवडे व्यायामशाळा, चिंचवड व ३) मुंजोबा चौक पिंपळे सौदागर या व्यायामशाळा वगळता उर्वरित प्रस्तावात नमुद तक्त्यातील क्र.१ ते २८ व्यायामशाळांना दि.०१ डिसेंबर २०१३ ते दि.३१ ऑक्टोंबर २०१४ अखेर सेवाशुल्क देऊन म.न.पा.व्यायामशाळा कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३४८/२०१५
दिनांक : ३०/०४/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.